## १)	बालरंगभूमी

मी मुंबईत आले तेव्हा बालरंगभूमीवर अनेक बालनाट्य जोरात चालू होती. तेव्हां सुधाताई करमरकर हे नाव प्रकर्षाने चमकत होते. त्यांच्या अनेक बालनाट्यांसाठी तेव्हा मी गायले होते. रंगभूमीवरच्या अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलावंतांनी त्यात भूमिका केल्या होत्या. वानगीदाखल दोन नावे सांगते – काशिनाथ घाणेकर, भक्ती बर्वे.

तसेच सुलभा देशपांडे, रत्नाकर मतकरी, आविष्काराचे काकडेकाका यांनीही बालरंगभूमीसाठी खूप काम केलं आहे. 'दुर्गा' झाली गौरी' हे त्या वेळेचे एक जबरदस्त लोकप्रिय बालनाट्य होते. पुण्यात ग्रीप्स नाट्यचळवळ ही मुख्यतः रूजविली ती रंगा गोडबोले, विभावरी देशपांडे आणि इतरांनी. तसेच गौरी केंद्रे आणि कांचन सोनटक्के यांचेही मोठे योगदान आहे.

परंतु आज बालनाट्य चळवळ काहीशी थंडावली आहे. तसेच तिच्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्याची कारणे माझ्या मते अशी आहेत –

१)	आजकालच्या मुलांना अधिक चॉईस आहे.

२)	तंत्रज्ञानामुळे टीव्ही आणि मोबाईल प्रगत, आधुनिक झाला आहे. त्यावर घरबसल्या विविध रियालिटी शोज, सिनेमा, गाणीबजावणी, ॲनिमेशन फिल्म्स् बघता येतात.

३)	जीवनाचा वेग वाढला आहे.

४)	मुलांवर शिक्षणाचे ओझे आहे. त्यांना थिएटरवर जाऊन बालनाट्य बघायला वेळ नाही.

५)	बालनाट्य सादर करायला खूप खर्च येतो. थिएटर भाडे, नेपथ्य, पोशाख इ. खर्च संस्थांना आजकाल परवडत नाही.

६)	आज जमाना इन्स्टंटचा आहे. मुलांच्या पालकांकडे वेळ नाही. बालनाट्याची तालीम करा, वेळ द्या, यात त्यांना आणि मुलांना रस नाही. त्याऐवजी रियालिटी शोज मध्ये भाग घेतला, प्रसिद्ध असलेल्या गाण्यावर हिरो हिरॉईनप्रमाणे नृत्य केले की लगेच प्रसिद्धी आणि पैसा मिळतो. महागायक, महागायिका, महानर्तकी होता येते. फारसे कष्ट न करता, विनासायास सर्व मिळते. मग कशाला बालनाट्य करा असा एकूण सूर असतो.